प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

दिनांक 18 जून 2018

**आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील प्रकल्पबाधितांना 12.5% योजनेअंतर्गत भूखंड वाटपाच्या आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी शिबिराचे आयोजन**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील जे प्रकल्पबाधित 12.5% योजनेंतर्गत भूखंडासाठी पात्र आहेत त्यांच्यासाठी भूखंड वाटपासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याकरिता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिर उलवे, तरघर, कोपर, वडघर, दापोली व वहाळ या विमानतळ प्रकल्पबाधित गावांमध्ये दिनांक 20 जून ते 3 जुलै 2018 पर्यंत आयोजित करण्यात आले आहे.

भूमी व भूमापन विभाग (साटयो) यांच्या वतीने साडेबारा टक्के योजनेंतर्गत भूखंड वाटप प्रक्रीया कार्यान्वित असून, मौजे उलवे, तरघर, कोपर, वडघर, दापोली व वहाळ या विमानतळबाधित गावांमध्ये भूधारकांना संचिका निहाय त्यांच्या पात्रतेप्रमाणे भूखंड इरादीत करण्यात आले आहेत. परंतु सदर प्रकरणी विहित कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी भूखंड वाटप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.

या अनुषंगाने सदर गावांमध्ये दिनांक 20 जून ते 3 जुलै 2018 या कालावधीमध्ये सकाळी 11 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिराचे वेळापत्रक खालीलप्रमाणे –

| **अ.क्र.** | **गाव** | **दिनांक** |
|---|---|---|
| 1. | उलवे | 20 जून 2018 |
| 2. | तरघर | 22 जून 2018 |
| 3. | कोपर | 25 जून 2018 |
| 4. | वडघर | 27 जून 2018 |
| 5. | दापोली | 29 जून 2018 |
| 6. | वहाळ | 2 व 3 जुलै 2018 |

सर्व प्रकल्पबाधितांना सिडकोतर्फे आवाहन करण्यात येते की त्यांनी या शिबिरामध्ये सिडकोचे भूमी विभागाचे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संपर्क साधून संचिकानिहाय कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत माहिती घेऊन त्याप्रमाणे पूर्तता करून इरादित भूखंड वाटपाच्या प्रक्रीयेला गती देण्याबाबत सहकार्य करावे.

---

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिध्दी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**